(WRS05C09)

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम,१९५८ चे कलम ३९ नुसार मा.मंत्री / मा. राज्यमंत्री (ग्रा.वि.) यांचेकडे होणा-या सुनावणी संदर्भात उपायुक्त (आस्था) व उपमुख्यकार्यकारी अधिकारी (ग्रापं) यांचेसाठी सूचना

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग,**
शासन परिपत्रक क्रमांक -व्हीपीएम २००९/प्र.क्र.४१/पंरा-३
मंत्रालय, मुंबई - ४०००३२
दिनांक - २८ मे, २००९

**परिपत्रक** -

मुंबई ग्राम पंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ३९ नुसार सरपंच /उपसरपंच /सदस्य किंवा अर्जदार यांनी विभागीय आयुक्त यांनी दिलेल्या निर्णयाविरुध्द शासनाकडे केलेल्या अपीलावर मा.मंत्री /मा. राज्यमंत्री यांच्याकडून सुनावणी घेण्यात येते. शासनाकडे केलेल्या अपीलावर सुनावणी लावल्यावर क्षेत्रिय अधिका-यांना सर्व संबंधितांना (अर्जदार व गैरअर्जदार/ वादी व प्रतिवादी तसेच संबंधित क्षेत्रिय अधिकारी ) सदर सुनावणीची नोटीस कळविण्याच्या सूचना देण्यात येतात तसेच संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांना आवश्यक त्या कागदपत्रांसह सुनावणीसाठी उपस्थित रहाण्यासंबधिच्या सूचना देण्यात येतात. मा.मंत्री / मा. राज्यमंत्री हे क्षेत्रिय अधिकारी यांच्याकडील मूळ कागदपत्रे , रेकॉर्ड वा अहवाल तपासूनच निर्णय देतात.

२. वस्तुतः मा.मंत्री / मा. राज्यमंत्री कार्यालयाकडून योग्य पूर्वसूचना देऊनच सुनावणीची तारीख, स्थळ व वेळ निश्चित करण्यात येते. त्यानुसार शासनाकडून फॅक्सव्दारे/ दूरध्वनीव्दारे विभागीय आयुक्त आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सुनावणीसंबधात कळविण्यात आल्यानंतर त्यांनी या बाबीची तत्काळ दखल घेऊन संबंधित अर्जदार व गैरअर्जदार / वादी व प्रतिवादी यांना तात्काळ सुनावणीची लेखी नोटीस काढून त्यांच्या हातात सुपूर्द करण्याची (बजावण्याची) व्यवस्था केली पाहिजे. तसेच उपायुक्त (आस्थापना) व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) यांनी तात्काळ या सुनावणीची शासनाने विहित केलेल्या नमुन्यात मुद्देनिहाय टिप्पणी व कागदपत्रांच्या प्रतीसह संपूर्ण प्रकरणाचा अभ्यास करुन व संभाव्य प्रश्नांची तयारी करुन सुनावणीकरीता उपस्थित राहिले पाहिजे.

३. तथापि, असे दिसून आले आहे की,

अ) प्रत्यक्ष सुनावणीच्यावेळी अर्जदार व गैरअर्जदार/ वादी व प्रतिवादी हे किंवा त्यांचे प्रतिनिधी सुनावणीची नोटीस क्षेत्रिय अधिका-यांकडून वेळेवर न मिळाल्याची तक्रार मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांच्याकडे करतात व सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती करतात.

ब) उपायुक्त (आस्थापना) व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) हे अनेक वेळा स्वतः उपस्थित न रहाता लिपिक दर्जाच्या प्रकरणाचर माहिती नसलेल्या व्यक्तीला सुनावणीसाठी पाठवितात.

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
शाखा:-
आवक नं.:- 20660
15 JUN 2009
विशेष नोंद वही नं.:-
कार्य विवरण नं.:-
15/06/09

क) उपायुक्त (आस्थापना) व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) हे अधिकारी कोणताही अभ्यास न करता उपस्थित रहातात व त्यामुळे त्यांना मा.मंत्री / मा. राज्यमंत्री यांनी विचारलेल्या प्रश्नांना सुयोग्य उत्तरे देता येत नाही असे काही प्रकरणामध्ये दिसून आले आहे.

ड) सुनावणीची योग्य ती तयारी न केल्याने निर्णय प्रक्रिया सुलभ करण्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे, सुनावणीसंदर्भातील उपस्थित होणारे शासन निर्णय, अधिनियम, नियमांच्या प्रती त्यांच्याकडून उपलब्ध होत नाहीत.

४. त्यामुळे सुनावणीवर विहीत काळात निर्णय देणे शक्य होत नाही व त्या पुढे ढकलण्यात येतात. मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांनी याबाबतची गंभीर दखल घेतली असून अशा कारणास्तव शासनाचा वेळ वाया जाऊ नये म्हणून क्षेत्रिय स्तरावर पुढील बाबींचे काटेकोरपणे पालन होणे आवश्यक आहे .तसेच या संदर्भात हलगर्जीपणा आढळून आल्यास याची गंभीर दखल घेण्यात येईल.यास्तव, मा.मंत्री / मा. राज्यमंत्री यांच्याकडे होणा-या सुनावणीची प्रकरणे जलद गतीने निपटारा होण्यासाठी खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

५. **सुचना** :

५.१) विभागीय आयुक्त व उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सुनावणीची नोटीस प्राप्त होताच सर्व संबंधितांना , अर्जदार व गैरअर्जदार/ वादी व प्रतिवादी तसेच संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांना आपल्या स्तरावरुन सुनावणीची नोटीस लेखी स्वरुपात देण्याची व्यवस्था करावी. तसेच यापैकी कोणीही सुनावणी संबंधीची नोटीस न मिळाल्याची तक्रार सुनावणीच्यावेळी केल्यास आपणास जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी. याबाबतचा पाठपुरावा करण्याची जबाबदारी उपायुक्त (आस्थापना) व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) यांची राहील .

५.२) उपायुक्त (आस्थापना) व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) सुनावणीच्या वेळी वेळेवर स्वत: हजर असणे आवश्यक आहे.

५.३) उपायुक्त (आस्थापना ) व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) यांना सुनावणीच्या वेळी उपस्थित रहाणे शक्य नसल्यास तसे त्यांनी आगाऊ लेखी कळवून परवानगी घेणे आवश्यक आहे.

५.४) सदरहू अधिका-यांनी प्रस्तुत प्रकरणाचा सविस्तर अभ्यास करुन व संभाव्य प्रश्नांची जुळणी करुन संपूर्ण तयारीनिशी आवश्यक मूळ कागदपत्रांसह व रेकॉर्डसह उपस्थित असणे आवश्यक आहे. तसेच मा.मंत्री/ राज्यमंत्री यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची शासन निर्णयाचा दाखला देऊन व मूळ रेकॉर्ड दाखवून सुस्पष्ट उत्तर देणे आवश्यक आहे.( यासाठी सर्व रेकॉर्ड व कागदपत्रे फ्लॅग लावून सुनावणीच्यावेळी ~~सज्ज ठेवणे~~ आवश्यक आहे.)

५.५) सुनावणीच्यावेळी उपस्थित रहाताना संबंधित क्षेत्रिय अधिका-यांनी ज्या प्रकरणाची सुनावणी असेल त्या प्रकरणाच्या **संक्षिप्त आणि सविस्तर** टिप्पणीच्या व कागदपत्रांच्या प्रतीच्या किमान ५ प्रती सोबत आणणे आवश्यक आहे. ( सोबत संक्षिप्त व सविस्तर दोन्ही प्रकारच्या टिप्पणीचे नमुने जोडले आहेत. )

५.६) सुनावणीच्यावेळी आवश्यक नियम, अधिनियम तसेच शासन निर्णय इ.च्या प्रतीही सोबत आणणे आवश्यक आहे.

५.७) क्षेत्रिय अधिका-यांनी सुनावणीच्या वेळी उपस्थित रहाताना सोबत आणवयाच्या कागदपत्रांमध्ये खालील बाबींचा समावेश असावा व त्याचा क्रम खालीलप्रमाणे असावा .

१) अनुक्रमणिका
२) मा.मंत्री / मा. राज्यमंत्री यांना सादर करावयाची प्रकरणाची संक्षिप्त टिप्पणी -१ (सोबत जोडल्याप्रमाणे)
३) मा.मंत्री / मा. राज्यमंत्री यांना सादर करावयाची प्रकरणाची सविस्तर टिप्पणी -२ (सोबत जोडल्याप्रमाणे)
४) मूळ तक्रारदाराच्या अर्जाची प्रत.
५) मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कलम ३९ नुसार विभागीय आयुक्त यांना सादर केलेल्या अहवालाची प्रत.
६) विभागीय आयुक्त यांनी दिलेल्या निकालाची प्रत.
७) सदर अहवालाच्या पृष्ठ्यर्थ सुनावणीसाठी आवश्यक कागदपत्राच्या व संबंधित शासननिर्णयाच्या / नियमांच्या प्रती .

६. यास्तव, विभागीय आयुक्त व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना या परिपत्रकाव्दारे निदेश देण्यात येत आहेत की, वरील सूचना सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणाव्यात. तसेच वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( मा. वा. गोडबोले )
अवर सचिव , महाराष्ट्र शासन

प्रति
१) मा.मंत्री (ग्राम विकास ) यांचे खाजगी सचिव.
२) मा.राज्यमंत्री (ग्राम विकास ) यांचे खाजगी सचिव.
३) सर्व विभागीय आयुक्त
४) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
५) सर्व जिल्हाधिकारी
६) निवडनस्ती का.क्र. पंरा-३

४ ~~१९~~ ~~२९३~~ ~~७६१~~

## सुनावणीकरिता मा. मंत्री / राज्यमंत्री (ग्राम विकास) यांना प्रकरणाबाबत सादर करावयाच्या सविस्तर टिप्पणी क्र.२ चा नमुना

**विषय :- मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ३९ (३) नुसार फेरतपासणी अर्ज.**

**नाव ----------- ,ग्रा.पं.---------,ता.-------,जि.---------**

## प्रकरणाची सविस्तर टिप्पणी क्र.२

| | | | |
|---|---|---|---|
| १ | प्रस्तुत तक्रारीत उपस्थित करण्यात आलेले आरोप क्र. १ | : | |
| | आरोप क्र. १ संबंधातील अभिप्राय | : | |
| २ | प्रस्तुत तक्रारीत उपस्थित करण्यात आलेले आरोप क्र. २ | : | |
| | आरोप क्र. २ संबंधातील अभिप्राय | : | |
| ३ | प्रस्तुत तक्रारीत उपस्थित करण्यात आलेले आरोप क्र. ३ | : | |
| | आरोप क्र. ३ संबंधातील अभिप्राय | : | |
| ४ | | | |
| ५ | | | |
| ... | | | |
| .... | | | |

टीप :- अभिप्रायामध्ये खालील बाबी नमूद कराव्यात.

(अ) प्रत्यक्षात प्रकरणाची वस्तुस्थिती काय आहे याची सविस्तर माहिती

(ब) प्रत्यक्षात शासनाचे नियम, सूचना, शा.नि. काय व कोणते आहेत . तसेच सदर नियमाचा क्रमांक दिनांक नमूद करावा.

२३
१८८
१८९

# अनुक्रमणिका

विषय :- मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ३९ (३) नुसार फेरतपासणी अर्ज.
नाव ----------- ,ग्रा.पं.----------,ता.--------,जि.----------

| | तपशील | : | पान क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | मा.मंत्री / मा. राज्यमंत्री यांना सादर करावयाची संक्षिप्त टिप्पणी -१ | : | |
| २ | मा.मंत्री / मा. राज्यमंत्री यांना सादर करावयाची सविस्तर टिप्पणी -२ | : | |
| ३ | मूळ तक्रारदाराच्या अर्जाची प्रत | : | |
| ४ | मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कलम ३९ खाली विभागीय आयुक्त यांना सादर केलेल्या अहवालाची प्रत | : | |
| ५ | विभागीय आयुक्त यांनी दिलेल्या निकालाची प्रत | : | |
| ६ | सदर अहवालाच्या पृष्ठ्यर्थ सुनावणीसाठी आवश्यक संबंधित शासननिर्णयाच्या / नियमांच्या / कागदपत्राच्या प्रती | : | |

25
453
225

**सुनावणीकरिता मा. मंत्री / राज्यमंत्री (ग्राम विकास) यांना प्रकरणाबाबत सादर करावयाच्या संक्षिप्त टिप्पणी क्र.१ चा नमुना**

विषय :- मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ३९ (३) नुसार फेरतपासणी अर्ज.
नाव ----------- ,ग्रा.पं.---------,ता.-------,जि.---------

**प्रकरणाची संक्षिप्त टिप्पणी -१**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपिलार्थीचे नाव व पत्ता | : | |
| २ | मूळ तक्रारदारांची नावे | : | |
| ३ | तक्रारीचा दिनांक | : | |
| ४ | मूळ तक्रारीतील आरोप | : | १)<br>२)<br>३)<br>४)<br>५)......... |
| ५ | मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विभागीय आयुक्त यांना सादर केलेल्या अहवालाचा दिनांक | : | |
| ६ | मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अहवालातील मुद्दे/ चौकशी अंती सिध्द झालेले आरोप / किंवा त्यांचे अभिप्राय | : | १)<br>२)<br>३)<br>४)<br>५).......... |
| ७ | विभागीय आयुक्त यांनी सुनावणी घेतल्याचा दिनांक | : | |
| ८ | विभागीय आयुक्त यांनी निकाल दिल्याचा दिनांक | : | |
| ९ | विभागीय आयुक्त यांच्या सुनावणीत सिध्द झालेल्या बाबी | : | |
| १० | विभागीय आयुक्त यांचा निकाल (संक्षिप्त गोषवारा) | : | |

form no.5 kalam 39 note for min.